**परिशिष्ट २**
**रू. १००/- एवढे मुद्रांक शुल्क असलेल्या बंधपत्रावर करावयाचे करारपत्र**
**करारनामा**

करारपत्राचा दिनांक .................. ठिकाण ...................... हा करारनामा (शाळेचे नाव) ...................................... पत्ता ...............................................

आणि

(बससेवा देणाऱ्या संस्थेचे / कंत्राटदाराचे नाव) ......................................... (कार्यालयाचा पत्ता) ...................................................................................

शालेय बस सेवा देणारा कंत्राटदार यांच्यामध्ये करण्यात येत आहे.

या करारनाम्यात एकत्रित ''दोन्ही पक्षांना'' व वैयक्तिक ''पक्षाला'' असे संबोधले आहे.

**ज्याअर्थी :**

१) उपरोक्त नमूद कंत्राटदारांकडे आवश्यक बसेस, चालक व इतर कर्मचारी उपलब्ध आहेत व शालेय बससेवा पुरविण्यास कंत्राटदार इच्छुक आहे.

२) कंत्राटदारांकडे आवश्यक कायदेशीर अनुज्ञप्ती, मान्यता व इतर वैयक्तिक कागदपत्रे उपलब्ध आहेत.

३) शाळेतील सर्व वर्गातील विद्यार्थी बस सेवेचा उपयोग करण्यास इच्छुक आहेत.

४) प्रत्येक विद्यार्थ्याला कंत्राटदाराबरोबर वैयक्तिकरित्या करार करणे शक्य नसल्याने विद्यार्थ्यांच्या वतीने शाळा हा करारनामा करीत आहे.

**दोन्ही पक्ष पुढील बाबींना मान्यता देवून या बाबींचे पालन करण्यास मान्यता देतात.**

१) विद्यार्थी व पालक शाळेच्या वतीने उपरोक्त नमूद कंत्राटदारास शालेय बस सेवा देण्यास व या करारनाम्याच्या कलम १३ मध्ये नमूद सेवा पुरविण्यास करारबद्ध करीत आहे.

२) शालेय बससेवा आवश्यक असणारे सर्व विद्यार्थी व कंत्राटदार यांच्यामध्ये ''सेवा पुरविण्याची'' शाळेची भूमिका असेल. या करारनाम्यामुळे कंत्राटदार अथवा कंत्राटदाराचा अन्य कर्मचारी हा शाळेचा कर्मचारी होऊ शकत नाही.

३) सर्व विद्यार्थ्यांच्या वतीने शाळेला हा करारनामा करण्यासाठी प्राधिकृत करण्यात आले आहे. ही बाब कंत्राटदार मान्य करतो. शालेय बससेवा पुरविण्याच्या अटी या करारनाम्याद्वारे अस्तित्वात येतील. त्यामुळे शाळेची संपूर्ण मान्यता असल्याखेरीज कंत्राटदार या करारनाम्यात कोणतेही बदल करू शकणार नाहीत. तसेच या करारनाम्याद्वारे पुरविण्याच्या सेवेमध्ये कोणतेही बदल करू शकणार नाही. याबाबत कंत्राटदार शाळेला शाश्वती देतो. शाळा ही बससेवा पुरविण्याबाबत वेळोवेळी जे धोरण ठेवेल, दर आणि मार्गदर्शक सूचना देईल त्यांचे पालन करणे कंत्राटदारास बंधनकारक असेल.

४) बससेवा सुरू करण्याचा दिनांक

बससेवा दिनांक ................ या दिनांकापासून सुरू करण्यास मान्यता देण्यात येते.

५) बससेवा सुरू करण्याच्या दिनांकाला विद्यार्थी संख्या :

बससेवा सुरू करण्याच्या दिनांकाला पुढीलप्रमाणे विद्यार्थी संख्या असेल. परिस्थितीनुसार वेळोवेळी विद्यार्थी संख्येचा आढावा घेण्यात येईल.

RTO PUNE COPY RIGHT